मुंबई विद्यापीठ

क्रं. घ.म./ ४ / २०१४ – २०१५

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानित आणि अशासकीय कायम विनाअनुदानित सर्व कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, सोशल वर्क, नृत्य आणि होम सायन्स महाविद्यालयातील प्राचार्य / अध्यक्ष / सचिव यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे की, राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करून त्यांना अनुषंगिक लाभ देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१२/(१३२/१२)/विशि–१ दिनांक २७ जून, २०१३ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार विद्वत परिषदेच्या दिनांक ०६/०१/२०१४ बैठकीत बाब क्रमांक ७.१ व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १८ फेब्रुवारी, २०१४, रोजी झालेल्या बैठकीत बाब क्रमांक ३० अन्वये स्विकारण्यात आलेला आहे.

सदर शासन निर्णयानुसार दिनांक १९.०९.१९९१ ते २३.१०.१९९२ पर्यंत ज्या शिक्षकांच्या नेमणूका विहित निवड समिती गठीत करून व इतर नियमांचे पालन करून त्यांच्या पदांना नेमणूकीच्या दिवसापासून मान्यता देण्याबाबतची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरू करण्यात आलेली आहे. ज्या शिक्षकांचे परिपूर्ण प्रस्ताव महाविद्यालयाकडून विद्यापीठास प्राप्त झालेले आहेत त्यांच्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर संबंधित महाविद्यालयांना त्याप्रमाणे कळविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेत क्रमांक २०१३०६२८१६५३११६७०८ या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– २० जून, २०१४

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानित आणि अशासकीय कायम विनाअनुदानित सर्व कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, सोशल वर्क, नृत्य आणि होम सायन्स महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :–

१. श्री विकास कदम, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२.
२. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११ ००१.
३. मा. सचांलक, तंत्र शिक्षण विभाग, महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१.
४. मा. सह–संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१.
५. मा. सह–संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा – रायगड –४१० २०६.
६. सह–संचालक, तंत्र शिक्षण विभाग, खेरवाडी, बांद्रा (पू), मुंबई–४०० ०५१.
७. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
८. स्वीय सहाय्यक, प्र–कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई –४०० ०३२.
९. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई –४०० ०३२.
१०. समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, बी– रोड, मुंबई.
११. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, बी–रोड, मुंबई.
१२. स्वीय सहायक, संचालक, बीसीयुडी, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
१३. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.) विद्यानगरी कॅम्पस, सांताक्रुझ, मुंबई – ४०० ०९८.
१४. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ